## व्यवस्थापन परिषदेची दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही |
|---|---|
| बाब १ | मुंबई विद्यापीठाचे सन २०१८–१९ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९–२०२० च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या स्विकृती व अधिसभेच्या विचारार्थसाठी सादर करण्याबाबत. |
| ठरावं | श्री प्रदिप सावंत व श्री राजन कोळंबेकर यांनी सदर अथसंकल्पाची बाब आयत्यावेळी पटलावर ठेवल्याने खेद व्यक्त केला व तशा स्वरुपाचे पत्र त्यांनी मा. कुलगुरुंना दिले.<br><br>सविस्तर चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या बाब क्र २ अन्वये सुधारणेसह सुचविलेल्या शिफारशींनुसार विद्यापीठाचा सन २०१८-२०१९ चा सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा मान्य करण्यात आला. सदर अर्थसंकल्पिय अंदाज महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम २९ (छ) (जी) प्रमाणे अधिसभेने मान्य करावा, अशी शिफारस करण्यात आली. |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | मुंबई विद्यापीठाचे सन २०१८-१९ चे सुधारीत अर्थसंकल्पीय अंदाजाचा मसुदा व सन २०१९-२०२० च्या अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१९ च्या बैठकीतील बाब क्र.१ वर केलेल्या शिफारशीनुसार सन २०१९-२०२० चा अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा दिनांक २५ एप्रिल, २०१९ रोजी संपन्न झालेल्या अधिसभेच्या बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर करण्यात आला. (सोबत अधिसभेसाठीची बाब जोडली आहे.) |

कुलसचिवांनी अध्यक्षांच्या परवानगीने सभा संपल्याचे जाहिर केले.

मुंबई - ४०० ०३२

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)